# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.12.2025** **वार:मंगळवार**

---

1) भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार कराराची घोषणा
2) देशभरात पाच कोटी ऐंशी लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी
3) महाराष्ट्रात महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू
4) बांगलादेशातील वाढत्या हिंसाचाराबद्दल संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून चिंता व्यक्त
आणि
5)महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि श्रीलंका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी- ट्वेंटी मालिकेतील दुसरा सामना आज

**<u>मुक्तव्यापारकरार</u>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार कराराची घोषणा काल करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांनी दूरध्वनीवरून संवाद साधत काल या कराराबाबत घोषणा केली. या करारामुळं येत्या पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, पुढील पंधरा वर्षांत विविध क्षेत्रांमध्ये न्यूझीलंडकडून वीस अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणुक भारतात होणार असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. हा करार जागतिक भू-राजकारणात भारताचे वाढते सामरिक महत्त्व दर्शवतो, असं सांगत यामुळे कुशल रोजगाराचे मार्ग खुले होतील, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना माहिती देताना सांगितलं.

भूपेंद्रयादव

अरवली पर्वतरांगेप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा अरवली ग्रीन वॉल प्रकल्पाद्वारे या पर्वतरांगेचे संरक्षण करण्याच्या सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना पाठबळ देत असून त्याचे समर्थन करतो,असं केंद्रीय पर्यावरण,वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी सांगितलं.ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते.खाणकामासाठी तपशीलवार व्यवस्थापन योजना तयार केली जाईपर्यंत कोणतेही नवीन खाणपट्टे जारी केले जाणार नाहीत,असं त्यांनी सांगितलं. या भागातील चार व्याघ्र प्रकल्प आणि २० वन्यजीव अभयारण्यांच्या संरक्षणावरही यादव यांनी यावेळी भर दिला.सरकार पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांचा समतोल साधत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**रबी**

देशात यावर्षी आतापर्यंत पाच कोटी  ऐंशी लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधी झालेल्या पेरण्याच्या तुलनेत ही संख्या सुमारे आठ लाख हेक्टरने अधिक आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं १९ डिसेंबरपर्यंतच्या रब्बी पिकांखालील क्षेत्राच्या प्रगतीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. गव्हाखालील क्षेत्र ३०१ लाख हेक्टरपेक्षा जास्त नोंदवले गेले आहे. ते  गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील ३०० लाख हेक्टरपेक्षा अधिक आहे. कडधान्याखालील क्षेत्र १२६ लाख हेक्टरपेक्षा जास्त आहे, तर भाताच्या क्षेत्रात १३ लाख हेक्टरपेक्षा जास्त लक्षणीय वाढ झाली आहे, असंही या अहवालात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**नड्डा-एनओए**

इन्फ्लूएंझाच्या प्रतिकारासाठी केंद्र आणि राज्यांनी समन्वित आणि एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे,असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी  म्हटलं  आहे. नवी दिल्लीत "इन्फ्लूएंझाची तयारी आणि प्रतिसादासाठी आंतरमंत्रालयीन आणि आंतरक्षेत्रीय समन्वयाला बळकटी देणे" या विषयावारील दोन दिवसीय चिंतन शिबिराच्या उद्घाटन सत्राला आभासी पद्धतीने संबोधित करताना ते काल  बोलत  होते.

**आरोग्यक्षेत्र**

"गेल्या अकरा वर्षांत नरेंद्र मोदी सरकारच्या काळात देशाच्या आरोग्य क्षेत्रात मोठे परिवर्तन झालं आहे, असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी म्हटलं आहे.  सरकारनं प्राथमिक पातळीपासून उच्चस्तरीय  आरोग्यसेवेपर्यंत संपूर्ण आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, असंही त्यांनी नमूद केलं. नवी दिल्ली इथं वर्धमान महावीर वैद्यकीय महाविद्यालय आणि सफदरजंग रुग्णालयाच्या सातव्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या.

**उमेदवारीअर्ज**

महाराष्ट्र राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू होत आहे. येत्या ३० डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. ३१ डिसेंबर रोजी अर्जांची छाननी होईल आणि २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. निवडणूक चिन्हांचं वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. या सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होईल, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

प्राप्तीकरविभाग

महाराष्ट्र राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये पैशांच्या वापरावर आळा घालण्यासाठी मुंबईतल्या प्राप्तीकर विभागानं चोवीस तास सुरू राहणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. निवडणूक काळात प्रचारासाठी बेहिशेबी रोकड, मौल्यवान वस्तू किंवा इतर प्रलोभनांबाबत नागरिकांनी जागरुक राहावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>संयुक्तराष्ट्र</u>**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी बांगलादेशातील वाढत्या हिंसाचाराबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली असून,सर्व अल्पसंख्याकांसाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यावर भर दिला आहे. गुटेरेस यांनी मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकार प्रत्येक बांगलादेशी नागरिकाला सुरक्षित ठेवण्यासाठी काम करेल, असा विश्वास व्यक्त केला. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना यांना पदावरून हटवल्यानंतर झालेल्या राजकीय अशांततेनंतर बांगलादेशातील हिंसाचार वाढला आहे.

**<u>बांगलादेश</u>**

बांगलादेशमध्ये गेल्या आठवड्यात दोन प्रमुख वृत्तपत्रांच्या कार्यालयांमध्ये झालेल्या हिंसाचार आणि जाळपोळीच्या घटना आणि त्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारच्या निष्क्रियतेच्या विरोधात बांगलादेशच्या संपादक परिषद आणि वृत्तपत्र मालक संघटनेनं ढाका इथं काल संयुक्त निषेध रॅली काढली.अल्पसंख्याक संघटनांच्या नेत्यांनी ढाका इथं मानवी साखळी तयार करून, धार्मिक आणि वांशिक अल्पसंख्याकांना लक्ष्य करून होणारा हिंसाचार थांबवण्यात हंगामी सरकारवर अपयशी ठरल्याचा आरोप केला.

**<u>ट्रंप</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'गोल्डन फ्लीट' या आपल्या संकल्पनेचा भाग म्हणून अमेरिकन नौदलासाठी एक नवीन, अत्यंत मोठ लढाऊ जहाज बांधण्याच्या योजनेची घोषणा केली आहे, त्याला त्यांनी 'बॅटलशिप' असं म्हटलं आहे. हे जहाज आतापर्यंतच्या इतर कोणत्याही लढाऊ जहाजापेक्षा अधिक वेगवान, मोठे आणि जास्त शक्तिशाली असेल. हे जहाज दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील आयोवा-श्रेणीच्या बॅटलशिपपेक्षा मोठे असेल आणि त्यात हायपरसोनिक क्षेपणास्त्रे, रेल गन आणि लेझर शस्त्रे असतील, असं ट्रंप यांनी म्हटलं आहे.

**<u>युक्रेन-रशिया-शांतता</u>**

युक्रेन आणि रशिया यांच्यातील शांतता करारासाठीच्या अमेरिकेच्या प्रस्तावांच्या सुरुवातीच्या मसुद्यांमध्ये कीवच्या अनेक मागण्या पूर्ण झाल्या आहेत,असं युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी काल सांगितलं.जवळपास चार वर्षे सुरू असलेल्या या युद्धात तोडगा काढण्यासाठीच्या चर्चेत कोणत्याही पक्षाला आपल्या सर्व मागण्या पूर्ण करून घेणे शक्य होणार नाही,असंही ते म्हणाले. तर "काही गोष्टींसाठी आम्ही कदाचित तयार नाही, आणि मला खात्री आहे की रशियन पक्षही काही गोष्टींसाठी तयार नाही," असंही झेलेन्स्की म्हणाले.

**<u>इस्रोउपग्रह</u>**

इस्रोच्या LVM3-M6 रॉकेटद्वारे अमेरिकेचा एएसटी स्पेसमोबाईल ब्लू बर्ड ब्लॉक-२ हा दूरसंचार उपग्रह उद्या प्रक्षेपित करण्यात येणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार उद्या सकाळी आठ वाजून५४ मिनिटांनी

हे प्रक्षेपण करण्यात येईल.या उपग्रहामुळे  कोणत्याही विशेष हार्डवेअरशिवाय सामान्य स्मार्टफोनला थेट सेल्युलर ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटीची सुविधा उपलब्ध होऊ शकणार आहे.

**<u>सायबर</u>**

केंद्र सरकारने FRI म्हणजेच आर्थिक जोखीम मापनाद्वारे गेल्या सहा  महिन्यांत सहाशे साठ कोटी रुपयांचे सायबर फसवणुकीचे नुकसान टाळलं आहे.दूरसंचार मंत्रालयानं दिलेल्या  माहितीनुसार एक हजाराहून अधिक बँका, आणि पेमेंट सिस्टम ऑपरेटर्स या डिजिटल इंटेलिजन्स प्लॅटफॉर्मवर  सहभागी असून त्यांनी सक्रियपणे FRI चा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. अनेक नागरिक संशयित आर्थिक फसवणुकीची तक्रार करण्यासाठी संचार साथी प्लॅटफॉर्मचा  वापर करत असल्याबद्दल दूरसंचार मंत्रालयानं समाधान व्यक्त  केलं आहे.

**<u>दिल्लीन्यायालय</u>**

दिल्ली न्यायालयानं १९८४ च्या शीखविरोधी दंगलींशी संबंधित एका खटल्यातील निर्णय काल राखून ठेवला, ज्यात काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार आरोपी आहेत.या खटल्यातील अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर विशेष न्यायाधीश दिग विनय सिंह यांनी पुढील महिन्याच्या २२ तारखेसाठी हा निर्णय राखून ठेवला आहे.

**<u>कुरूलकर</u>**

पाकिस्तानी गुप्तहेर संस्थेला गोपनीय माहिती पुरविल्याच्या आरोपाखाली कारागृहात असलेला संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचा अर्थात डीआरडीओचा माजी संचालक आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ प्रदीप कुरूलकरवर दोषारोप निश्चिती संदर्भातील सुनावणी येत्या १२ जानेवारी रोजी होणार आहे. पुण्यातल्या विशेष न्यायालयात काल कुरूलकर याच्या विरोधात दोषारोप निश्चितीसंदर्भात प्राथमिक सुनावणी झाली.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि श्रीलंका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी- ट्वेंटी मालिकेतील दुसरा सामना आज विशाखापट्टणम इथल्या डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए मैदानावर खेळला जाईल. हा सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. यजमान संघांनं मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं गेल्या रविवारी झालेल्या पहिल्या टी- ट्वेंटी सामन्यात श्रीलंकेचा आठ गडी राखून पराभव केला होता.

**<u>हवामान</u>**

देशाच्या उत्तर आणि इशान्येकंदील  बहुतेक भागांमध्ये उद्यापर्यंत दाट धुक्याची शक्यता आहे. २७ डिसेंबरपर्यंत पंजाबमध्ये दाट धुक्याचा अंदाज वर्तवण्यात आला  असून  दाट धुक्यामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर कमी दृश्यमानतेमुळे सुमारे १४

विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली. तर दिल्लीकडे जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला असून, ३५ हून अधिक गाड्या तीन तासांपेक्षा जास्त उशिरानं धावत आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**